# प्रेसनोट

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विषयावर कार्यशाळा

जा.क्र. ११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०१/२०१८

भंडारा:— पोलीस मिटींग हॉल येथे आज दि. ०५/०१/२०१८ रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे यांच्या माध्यमातुन भंडारा जिल्हा पोलीसांकरीता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर तसेच यशदा संस्था, पुणे. येथील कोऑर्डीनेटर वानखेडे, तसेच व्याख्याते प्रभुणे, अग्रवाल हे होते. कार्यक्रमाला फुलझाडे देवुन पाहुण्यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन सुरुवात करण्यात आली.

यावेळी कार्यशाळेला मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू यांनी, उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना माहितीच्या अधिकारा विषयीचे संपुर्ण ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कार्याशाळेमुळे सर्वाच्या ज्ञानात चांगली भर पडेल त्यामुळे माहिती अधीकारांतर्गत विवीध कालावधीत माहिती मागणाऱ्यास अपेक्षित अचुक माहिती पाठविणे सोयीचे होईल. याबाबत माहिती दिली.

यावेळी यशदा संस्था, पुणे. येथील व्याख्याते श्री. प्रभुणे यांनी आपल्या भाषणात माहितीचा अधिकार अधिनीयम, २००५ मधील आर. टी. ॲक्ट वापर माहिती अधिकार कायद्याचा इतिहास, स्वरुप, उद्दिष्टे व्याप्ती व कायदयातील महत्वाच्या संकल्पना (कलम १ते ३) समुचित शासन व सार्वजनीक प्राधिकरणाच्या जवाबदाऱ्या स्वयंप्रेरणेने प्रकटन करावयाची माहिती (१ते १७बाबी) तसेच (कलम —०४) स्वयंप्रेरणेने करावयाचे प्रकट नमुने जन माहिती अधिकारी पदनिर्देशन(कलम ०५) इ. विषयावर माहिती दिली.

यावेळी यशदा संस्था, पुणे. येथील कोऑर्डीनेटर श्री. अग्रवाल यांनी माहिती मागविण्यासाठी अर्ज करणे अर्ज निकाली काढण्याची प्रकीया (कलम ६ते ७), माहिती प्रकट करण्याचे अपवाद (कलम ८ते९ )अंशत:द्यावयाची व त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्याची कार्यपध्दती(कलम १०ते ११), माहिती आयुक्त— अधिकार, कार्य व कर्तव्य (कलम १२ते १८), प्रथम व दिव्तीय अपील त्यावर करावयाची व शास्ती (कलम १९ते २०), माहिती, वैयक्तिक माहिती, जनहित व त्रयस्थ पक्ष या संदर्भातील महत्वाचे न्यायनिवाडे, संकीर्ण कलम २१ ते ३१, जन माहिती यांनी करावयाचा पत्रव्यवहार व विवीध प्रकारचे नमुने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी करावयाचा पत्रव्यवहार व निकालपत्र याविषयावर माहिती देण्यात आली.

सदर कार्यक्रमाला पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड, पोनी. सिडाम पोनी. चव्हाण, पोनी. ढोबळे, पोनी. नेवारे, सपोनि. कोयंडे, राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, पोलीस अधिकारी, कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. वानखेडे यांनी केले.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.